# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२६४
२५६०१२६५
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ – साफुपुवि/निववि/792 दिनांक : 22/०८/२०१७

प्रति,
मा.विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे–४११००७

**विषय : विद्यापीठ शैक्षणिक व प्रशासकीय विभाग गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याच्या तारखेस मुदतवाढीबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.साफुपुवि/निववि/३४, दिनांक १४/०७/२०१७.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ शैक्षणिक व प्रशासकीय विभागांकरिता गुणवत्ता सुधार योजना सन २०१२–१३ पासून सुरु करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सन २०१७–१८ मध्ये सदरहू योजना राबविण्याकरिता विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे. या योजनेअंतर्गत कार्यशाळा, चर्चासत्र, व्याख्यानमाला आयोजित करण्याकरिता तसेच शैक्षणिक उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्याकरिता ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी दिनांक १४ जुलै, २०१७ ते दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ असा होता.

सदर प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याचा कालावधीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर **मुदतवाढ दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ अशी राहील.** सदर प्रस्तावाची हार्ड कॉपी **दिनांक ०४ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे :–

**(unipune.ac.in–Home page–BCUD online–Login–For University Departments)**

वेळेची मर्यादा लक्षात घेता, विहित मुदतीनंतर सादर केलेल्या प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त ऑफलाईन कोणतेही प्रस्तावी मुदतीनंतर स्वीकारले जाणार नाहीत व यानंतर प्रस्ताव सादर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

22/8

उपकुलसचिव
नियोजन व विकास